# शेती पुरक व्यवसाय : मधमाशी पालन

प्रा. वैभव गिरी
सहाय्यक प्राध्यापक
कृषी किटकशास्त्र विभाग

प्रा. तुषार जगताप
सहाय्यक प्राध्यापक
कृषी किटकशास्त्र विभाग

प्रा. संजय बडे
सहाय्यक प्राध्यापक
कृषी किटकशास्त्र विभाग

दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय, दहेगाव, औरंगाबाद

गेल्या काही वर्षांपासून देशातील बळीराजा पारंपरिक शेतीसोबत आधुनिक शेती करण्यावर भर देत असून शेतीमध्ये विविध प्रयोग करत आहेत. आधी शेतीसह जोडव्यवसाय म्हणून शेतकरी फक्त पशुपालनाचा व्यवसाय करत असायचा आता मात्र पशुव्यवसायासह मत्स्य पालन, मधुमक्षिका पालन यासारखे शेती पुरक व्यवसाय करत आहेत. आज आम्ही आपल्याला मधुमक्षिका पालनाविषयी माहिती देणार आहोत. राष्ट्रीय कृषी विकास कार्यक्रमांतर्गत ही योजना लघुउद्योग श्रेणीत असून मधुमक्षिका पालन व्यवसाय करण्यासाठी शासन शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानही देते.



मधुमक्षिकापालनमधून आणखी एक दुय्यम उत्पादन मिळते, ज्याची मार्केटमध्ये खूप मागणी आहे आणि ते म्हणजे मेण, ज्यापासून मेणबत्ती तयार करतात. म्हणजे व्यवसाय एक आहे पण त्याचे फायदे अनेक आहेत. नवोदित व्यावसायिकांना ही एक सुवर्णसंधी आहे, कमी गुंतवणूक करून व कमी कालावधीत भरपूर उत्पन्न कमवू शकतात. आपल्याला मध शेती करायची असेल तर आपल्याला मोठ्या व मोकळ्या जागेची गरज असते. जर तुम्हाला २००-२५० पेट्या ठेवायच्या असतील तर साधारण ४५०० स्केअर फूट जागेची गरज लागेल. आपण आपल्या शेतात ही जागे जागेवर या मध पेट्या ठेवू शकतो.

मधुमक्षिका पालन करताना एक गोष्ट लक्षात ठेवायची ती म्हणजे मधमाशी कोणती घ्यायची याची माहिति जाणकारांकडून घ्यावी. भारतामध्ये मधमाश्यांच्या चार प्रजाती आहेत.

- दगडी माशी अपीस डोरसाटा: या माशा उत्तम प्रकारे मध गोळा करतात आणि त्यांच्या प्रत्येक वसाहतीमागे सरासरी मध उत्पादन ५०-८० किलो असते.
- लहान माशी अपीस फ्लोरिआ: या माशा कमी मध गोळा करतात आणि त्यांच्या प्रत्येक वसाहतीमागे अंदाजे २००-९०० ग्रॅम मध मिळतो.
- भारतीय मधमाशी अपीस सेराना इंडीका: या मधमाशांद्वारे होणारं मध उत्पादन दर वर्षी प्रति वसाहत ६-८ किलो असते.
- युरोपिअन मधमाशी इटालिअन मधमाशी अपीस मेल्लीफेरा: यांच दर वसाहतीमागे सरासरी मध उत्पादन २५-४० किलो असते.

मधुमक्षिका पालनासाठी मधमाशी बरोबर पेटीची आवश्यकता असते. एका पेटीची किंमत ही सुमारे ३५०० असते. या पेटीत एकूण दहा फ्रेम असतात. तर एका फ्रेम मध्ये २५० ते ३०० माशा राहतात. माशीची निवड केल्यानंतर पेट्या योग्य ठिकाणी ठेवाव्यात. कालांतराने माशा मध पेटीत साठवण्यास सुरुवात करतील. मधाचे पोळे मधाने भरल्यानंतर ते योग्य पद्धतीने चाकूने कापून घ्यावे. त्यानंतर कापून घेतलेला भाग यंत्रात टाकावा. यंत्र सुरू झाल्यावर मध बाजूला होऊन नको असलेला भाग वेगळा होईल.

एका फ्रेम मधून साधारण २०० ग्रॅम एवढा मध मिळते म्हणजे एका पेटीतून २ किलो मध आपल्याला प्राप्त होतो. एका पेटीतून आपण महिन्याला ४ किलो मध काढू शकतो. हे मध आपणाला जनरल स्टोअर्स आणि किराणा स्टोअर मध्ये विकता येते.

तसेच मध उत्पादन करणाऱ्या कपन्यांशी संलग्न राहून आपण त्यांनाही मध विकू शकतो. याला सरासरी १०० रुपये किलो इतका भाव मिळतो. अशा प्रकारे आपण एका महिन्याला १,१५,००० रुपये किंमतीचे मध विकू शकतो.

चोरमाश्या:

स्वत:च्या पोळ्यातील मध कमी झाला व जवळपास मकरंद जमा करण्यासारखी फुले नसली, तर अशा पोळ्यातील काही माश्या दुसऱ्या पोळ्यातून मधाची चोरी करतात. अशा चोरी करणाऱ्या माश्यांत पिवळ्या रंगाच्या माश्यांचे प्रमाण जास्त असते. एकदा मधाची चोरी करण्याची सवय लागली की त्या पोळ्यातील इतर माश्याही हेच करू लागतात व नैसर्गिक मार्गाने मकरंद जमविण्याचे सोडून देतात.

पोळ्याचे प्रवेशद्वार लहान केले व पोळे चांगले बळकट असले म्हणजे रक्षण करणाऱ्या कामकरी माश्या चोरमाश्यांना आत येऊ देत नाहीत. तसेच जवळजवळ असणाऱ्या पोळ्यांतील मध एकाच वेळी काढून घेतला व मधाचे सुगंध बाहेर दरवळणार नाही याची काळजी घेतली म्हणजे चोरमाश्या पोळ्याकडे आकर्षित होत नाहीत.

### मधाच्या पोळ्याची स्थापना कुठे कराल:



पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनीत मध उत्पादन केंद्र उभारावे. फळबागांच्या जवळ मकरंद, परागकण आणि भरपूर पाणी असलेल्या ठिकाणी उभारणी करावी. पोळ्याचे तापमान आवश्यक तितके राहण्यासाठी सूर्यप्रकाशापासून मधमाशांचे संरक्षण करणे महत्त्वाचे आहे. मधमाशा पेटीत ठेवतांना चारही पायाखाली पाण्याने भरलेली वाटी ॲन्टवेल्स ठेवावी, जेणेकरून पेटीत मुंग्या जाणार नाहीत. वसाहतींना पाळीव जनावर, अन्य प्राणी, गर्दीचे रस्ते, इलेक्ट्रीक पोल पासून दूर ठेवावे.

### मध शेती करताना घ्या काळजी:

मध शेती करताना पेट्या या खुल्या जागेत ठेवाव्यात. तसेच मधमाश्यांना त्रास दिल्यास त्या चावतात त्यामुळे त्यांनी चावा घेतल्यास योग्य उपचार घेणे गरजेचे आहे. दरम्यान मधमाशी पालनासाठी प्रशिक्षण जर घ्यावयाचे असेल तर भारत सरकारच्या सेंट्रल बी रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट मध्ये जाऊ शकता तसेच http://nbb.gov.in या संकेस्थळावरील माहिती पाहू शकता.

### मधाची काढणी:



पोळ्याच्या ज्या भागातून मध काढायचा आहे त्या भागातील मधमाशांना धुरानं दूर करावे आणि पोळी काळजीपूर्वक कापून घ्यावीत. मधाची काढणी शक्यतो दोन मुख्य फुलोऱ्याच्या मोसमांच्या दरम्यान आणि त्यांच्या लगेच नंतर, अनुक्रमे ऑक्टोबर / नोव्हेंबर आणि फेब्रुवारी-जूनमध्ये काढणे शक्य होते. पिकलेले पोळे रंगाने हलके असते आणि मधाने भरलेले असते. दोन्ही बाजूंच्या निम्म्यापेक्षा अधिक मधाचे कप्पे मेणाने बंद केलेले असतात.

### मधमाशी पालनाचे फायदे:

- फुलांचा रस/पराग यांचा सदुपयोग होतो. आर्थिक प्राप्ती मिळते व रोजगाराचा प्रश्न सुटतो.
- शुद्ध मधाचे उत्पादन, मेणाचे उत्पादन व इतर आधारीत वस्तुंचे उत्पादन होते.
- कोणत्याही इतर जास्तीच्या खताशिवाय, बियांशिवाय मधमाशी पालन हे शेताच्या बांधावर/शेतालगत केल्याने त्याचा फायदा शेतीला होतो. शेतीतील भाजी, फुलांच्या उत्पादनात सव्वा ते दिड पटींनी वाढ होते. कारण मधमाशा ह्या परागीकरणाचे काम उत्तमरित्या करतात.
- मधाच्या सेवनाने मानवाचे आरोग्य उत्तम राहते. ते एका प्राकृतिक औषधाचे काम करते. मधाचे सेवनाने अनेक रोग होत नाहीत. रक्तदाब, लठ्ठपणा आदी रोगांमध्ये फायदा होतो.
- मधमाशी पालनात फारच कमी खर्च लागतो व तुलनेने कमी वेळपण लागतो. त्यास जागाही फारच कमी लागते.
- कमी प्रतवारी असणाऱ्या जमिनीच्या शेतात मधमाशी पालनाचे फायदे आहेत. ती जमिन वापरात येते.
- पर्यावरणावर मधमाशी पालनाचा सकारात्मक प्रभाव पडतो. परागीकरणासाठी मधमाश्या फारच महत्त्वाची भूमिका पार पाडतात. त्यामुळे फळांचे उत्पादनही वाढते.

### मधाचे फायदे:

- ऊर्जा देणारे एक उत्तम नैसर्गिक अन्नघटक.
- एक चांगले ॲन्टीबायोटिक आणि ॲन्टीसेप्टीक.
- स्नायूंना बळकटी देते. खोकला, कफ, दमा या विकारांवर उपयुक्त.
- यकृत व पोटाच्या आजारावर उपयुक्त. वजन कमी करण्यासाठी फायदेशीर.
- जलद थकवा घालवून कार्यशक्ती वाढवते.
- विविध प्रकारच्या सौंदर्य प्रसाधनामध्येही याचा वापर होत असतो.
- यासह काही पिकांनाही मधमाशांचा फायदा होत असतो. यात कापूस, मोहरी, तीळ, कराळ, सुर्यफूल, वांगी, भेंडी, मिरची, काकडी, भोपळा, टोमॅटो, दुधी भोपळा, कारले, सफरचंद, लिंबू, संत्री, मोसंबी, पेरू, लिची तूर, मूग, उडीद या पिकांना चांगला फायदा होत असतो.

काही दिवसांपुर्वीच अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी शेती आणि शेतीला पुरक असलेल्या व्यवसायांना आर्थिक मदत जाहीर केली. त्यात मधुमक्षिका पालनासाठीही सरकारने आर्थिक पॅकेज जाहीर केले आहे. यामुळे मधुमक्षिका पालन करणाऱ्यांना नक्कीच आनंद झाला असेल. यासह आणखी एक आनंदाची बातमी म्हणजे अत्यंत विषारी कीटकनाशकांवर सरकारने बंदी घातली आहे. या कीटकनाशकांचा मधमाशांवर विपरित परिणाम होत होता त्यामुळे औषधांवरील बंदीमुळे मधमाशांचे कार्य अधिक जलद होईल आणि शेतकऱ्यांना फायदा होईल.

(संपर्क: +९१ ९१४६४१२२१०)

★ ★ ★